सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानसभेच्या
# नियम समितीचा अंतिम अहवाल
# २०२१
# (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)
# पहिला अंतिम अहवाल

(दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी विधानसभेस
सादर केला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
डिसेंबर, २०२१

# महाराष्ट्र विधानसभेच्या
# नियम समितीचा अंतिम अहवाल
# २०२१

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)
## पहिला अंतिम अहवाल

(दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी निर्गमित
केलेल्या शुद्धीपत्राचा यात अतंर्भाव केला आहे)

एचबी १८५२—१

## विधानसभा नियम समितीची रचना
## ( २०२०-२०२१ )

### समिती प्रमुख

*श्री. नरहरी झिरवाळ, मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा तथा कार्यकारी समितीप्रमुख.

### सदस्य

श्री. दिपक केसरकर, वि.स.स.
डॉ. तानाजी सावंत, वि.स.स
श्री. मकरंद जाधव-पाटील, वि.स.स.
ॲड. अशोक पवार, वि.स.स.
श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स.
श्री. सुभाष धोटे, वि.स.स.
**श्री. गिरीष महाजन, वि.स.स.
श्री. धनंजय गाडगीळ, वि.स.स.
श्री. जयकुमार गोरे, वि.स.स.
डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव.
श्री. विलास आठवले, उप सचिव.
श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव.
श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

*मा. अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२१ रोजी पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर दिनांक ०५ जुलै २०२१ रोजी पासून मा. उपाध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा यांची कार्यकारी समिती प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**श्री. गिरीष महाजन, वि.स.स. यांचे सदस्यत्व सभागृहात दिनांक ५ जुलै, २०२१ रोजीच्या प्रस्तावान्वये एकूण एक वर्षाच्या कालावधीकरिता निलंबित करण्यात आले आहे.

# अहवाल

मी, कार्यकारी समिती प्रमुख विधानसभा नियम समिती, समितीने आपल्या वतीने अहवाल सादर करण्यास मला प्राधिकृत केल्यावरुन विधानसभेला हा अहवाल सादर करीत आहे.

२. महाराष्ट्र विधानसभा नियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी एकूण २ सूचना/सुधारणा समितीपुढे विचारार्थ होत्या. उक्त सूचनांवर सविस्तर विचारविनिमय होण्याच्या दृष्टीने समितीच्या मंगळवार, दिनांक ०६ जुलै, २०२१, बुधवार, दिनांक २२ सप्टेंबर, २०२१, बुधवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२१ व बुधवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२१ रोजी बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या.समितीकडे प्राप्त झालेल्या सदर सूचना/सुधारणाची यादी "अनुसूची-एक" मध्ये दर्शविण्यात आली आहे. समितीने मान्य केलेल्या सूचना/सुधारणा "अनुसूची-दोन" मध्ये दर्शविण्यात आली आहे.

३. समितीच्या दिनांक २२ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत काही सन्माननीय सदस्यांनी दिनांक ६ जुलै, २०२१ रोजीची बैठक निमंत्रणाविना आयोजित केल्याची बाब उपस्थित केली. त्यावर समितीने मा. सदस्यांना बैठकीचे पत्र वितरीत केले असून काही सदस्यांना पत्र पोहचू शकले नाही. ही बाब मान्य करुन प्रस्तावित प्रारुप सुधारणांवर विचारविनिमय करण्यासाठी दिनांक ८ डिसेंबर, २०२१ रोजी समितीची बैठक पुन्हा बोलविली. उक्त बैठकीत समितीचा निर्णय एकमताने व्हावा यासाठी दिनांक ८ डिसेंबर, २०२१ रोजीची बैठक स्थगित करुन दिनांक १५ डिसेंबर, २०२१ रोजी पुन्हा बैठक घेण्यात आली. उक्त बैठकीत सर्वश्री. जयकुमार गोरे, धनंजय गाडगीळ व डॉ. संदीप धुर्वे वि.स.स. यांनी अहवालात प्रस्तावित केलेल्या सुधारणेस विरोध केला. तसेच सदरची सुधारणा बेकायदेशीर असून ती रद्द करण्यात यावी. तथापि, समितीच्या कोणत्याही सदस्यांनी प्रस्तावित सुधारणेस कोणतीही सुधारणा सुचविली नाही. या अहवालास उपरोक्त सदस्यांनी विरोध केला असून त्यांनी स्वतंत्रपणे भिन्न मतपत्रिकांची अहवालात नोंद घेण्यात यावी अशी विनंती केली. समितीने उपरोक्त सदस्यांची विनंती मान्य करुन सदरच्या भिन्न मतपत्रिकांची अंतरिम अहवालात नोंद घेण्यात आली.

श्री.दिपक केसरकर, वि.स.स. यांनी राज्याच्या विधानपरिषदेत, देशाच्या लोक सभेत व इतर राज्यांच्या विधानसभेमध्ये देखील अध्यक्षांची निवड नियमात सुधारणा केल्याप्रमाणे सभागृहात प्रस्तावित नियमाप्रमाणे करण्याची तरतूद आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने कुलदीप नायर व इतर विरुद्ध भारत सरकार व इतर या प्रकरणी दिनांक २२ ऑगस्ट, २००६ रोजीच्या न्याय निर्णयात सभागृहातील मतदान खुल्या पद्धतीने व्हावे, असा निर्णय दिलेला आहे. नवीन विधानसभेच्या अध्यक्षांची निवड-

देखील खुल्या पद्धतीने करण्यात आली असल्याचे त्यांनी विशद केले. ॲड. अशोक पवार, वि. स. स. यांनी प्रस्तावित सुधारणा मान्य  झाल्यास अध्यक्षांच्या निवडीमध्ये घोडेबाजार होणार नाही, ही एक चांगली लोकशाही पद्धत आहे. लोकसभा व इतर राज्यांच्या विधानसभेमध्ये असलेल्या पद्धतीची अंमलबजावणी समितीमार्फत होत असल्यामुळे त्यांनी समाधान व्यक्त केले.

४. समितीने बुधवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२१ रोजी संमत आणि स्वीकृत केलेला अहवाल पुढीलप्रमाणे आहे.—

**५. मान्य केलेली सुधारणा क्रमांक १.**

लोकसभा किंवा महाराष्ट्र विधानपरिषद नियमांच्या धर्तीवर महाराष्ट्र विधानसभा नियम ६ (अध्यक्षांची निवडणूक) मध्ये सुधारणा करण्यासंदर्भात विधानसभा नियम समितीच्या मंगळवार दिनांक ०६ जुलै, २०२१ रोजीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.त्याप्रमाणे दिनांक २२सप्टेंबर, २०२१ व दिनांक ८ डिसेंबर, २०२१ रोजी समितीने प्रस्तावित केलेल्या सुधारणांवर विचारविनिमय केला. त्यानंतर समितीने दिनांक १५ डिसेंबर, २०२१ रोजी प्रस्तुत सुधारणा व अहवालाचे प्रारुप संमत केले. **महाराष्ट्र विधानसभा नियम ६ मध्ये आवश्यक ती सुधारणा या अहवालाद्वारे करण्यात येत आहे.**

**६. मान्य केलेली सुधारणा क्रमांक २.**

महाराष्ट्र विधानसभा नियम ६ च्या अनुषंगाने महाराष्ट्र विधानसभा नियम ७ (उपाध्यक्षांची निवडणूक) मध्ये सुधारणा करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे **महाराष्ट्र विधानसभा नियम ७ मध्ये आवश्यक ती सुधारणा या अहवालाद्वारे करण्यात येत आहे.**

समितीने अंतरिम अहवाल दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवल्यानंतर उक्त अहवालात शिफारस केलेल्या सुधारणांना विधानसभेच्या सर्व सन्माननीय सदस्यांकडून सूचना / सुधारणा मागविण्यात आल्या होत्या. विधानसभेच्या सदस्यांकडून एकूण ४७ सूचना समितीला प्राप्त झाल्या. सदरच्या सूचना / सुधारणा समितीने दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजीच्या बैठकीत विचारार्थ घेतल्या असून त्यावर समितीने प्रत्येक सदस्यास आपले मत मांडण्यास सांगितले. सदस्यांनी उक्त सूचना / सुधारणांवर त्यांचे मत मांडल्यावर समितीने प्राप्त झालेले उक्त सूचना / सुधारणा ०४ विरुद्ध ०३ अशा बहुमताने अमान्य केल्या. या सूचना/ सुधारणा बाबतची माहिती या अहवालात **अनुसूची "तीन"** मध्ये दर्शविण्यात आली आहे.

अंतरिम अहवालात सर्वश्री जयकुमार गोरे, डॉ. संदिप धुर्वे व धनंजय गाडगीळ यांनी भिन्न पत्रिका सादर केली होती. संसदीय प्रथे परंपरेप्रमाणे भिन्न मत पत्रिका संयुक्त समितीच्या अहवालासोबत जोडण्यात येते. तथापि, इतर समितीच्या अहवालांना ती जोडण्यात येत नाही. समितीचे कामकाज पक्षीय अभिनिवेश न ठेवता करण्यात येते शक्यतोवर एकमताने निर्णय व्हावा अशी अपेक्षा असते. तथापि, उपरोक्त सदस्यांचा आग्रह पाहता सदरची भिन्न मतपत्रिकांचा नापसंतीच्या रुपाने अहवालाच्या **अनुसूची** "**चार**", "**पाच**", **व** "**सहा**" मध्ये समावेश करण्यात आला आहे.

समितीला सन्माननीय सदस्यांकडून प्राप्त झालेल्या सर्व सूचना / सुधारणा समितीने अमान्य केल्या आहेत. त्यामुळे अंतरिम अहवालाला कोणत्याही नवीन सुधारणा जोडलेल्या नाहीत. अंतिम अहवाल प्रारुपास समितीने दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी मान्यता दिली आहे.

हा अंतिम अहवाल व महाराष्ट्र विधानसभा नियमात सुचविण्यात आलेल्या सुधारणा सभागृहाने संमत करण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक २३ डिसेंबर, २०२१.

**नरहरी झिरवाळ,**
कार्यकारी समिति प्रमुख,
विधानसभा नियम समिती.

$\gamma$

# अनुसूची - एक

## विधानसभा नियम समितीपुढे विचारार्थ असलेले मुद्दे

| अ.क्र | नियम क्रमांक | सुधारणा/सूचना | सुधारणेचे/सुचनेचे कारण | कक्ष |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | नियम ६ "अध्यक्षांची निवडणूक" | नियम ६ च्या पोट नियम (१) मध्ये **"निवडणूक घेण्यासाठी"** हा मजकूर वगळून **"मुख्यमंत्री यांच्या शिफारशीवरून अध्यक्षांची निवड करण्यासाठी"** हा मजकूर दाखल करण्यात यावा.<br>नियम ६ च्या पोट नियम (२) मध्ये **"अशा रीतीने ठरविलेल्या तारखेच्या अगोदरच्या दिवसाच्या मध्यान्हाच्या पूर्वी कोणत्याही वेळी कोणत्याही सदस्यास,"** या मजकूरानंतर **"निवडणुकीसाठी"** या मजकूराऐवजी **"अध्यक्षांची निवड करण्यासाठी"** हा मजकूर दाखल करण्यात यावा."<br>नियम ६ च्या पोट नियम (२) (अ) व (ब) नंतर पुढील परंतुक दाखल करण्यात यावे. **"परंतु, सदस्याला स्वत:चे नाव सुचविता येणार नाही अथवा त्याचे नाव सुचविण्यात आलेल्या प्रस्तावाला अनुमोदन देता येणार नाही अथवा एकाहून अधिक प्रस्ताव मांडता येणार नाहीत किंवा त्यांना अनुमोदन देता येणार नाही."**<br>नियम ६ च्या पोट नियम (३) ऐवजी **"(३) (अ) कामकाज पत्रिकेत प्रस्ताव ज्याच्या नावावर असेल अशा सदस्याचे नाव पुकारण्यात आल्यानंतर, त्याला प्रस्ताव मांडता येईल अथवा मागे घेता येईल आणि त्यावेळी त्याचे निवेदन तेवढ्यापुरतेच मर्यादित राहील.** | लोकसभा किंवा महाराष्ट्र विधानपरिषद नियमांच्या धर्तीवर विधानसभेच्या नियम ६ व ७ मध्ये बदल करण्यासंदर्भात. | महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | **(ब) जे प्रस्ताव मांडले गेले असतील व ज्यांना रीतसर अनुमोदन देण्यात आले असेल, असे प्रस्ताव ज्या क्रमाने मांडण्यात आले असतील त्याप्रमाणे ते एकामागून एक सभागृहापुढे ठेवण्यात येतील व आवश्यक वाटल्यास मत विभाजनाद्वारे त्यावर निर्णय घेतला जाईल. प्रस्तावाच्या मत विभाजनाच्या वेळी सम-समान मते पडल्यास उपाध्यक्ष, विधानसभेने ठरविलेली व्यक्ती किंवा संविधानाच्या अनुच्छेद १८० च्या खंड (१) अन्वये नेमलेल्या व्यक्तीस, निर्णायक मत (Casting Vote) देण्याचा अधिकार असेल.**<br><br>**(क) कोणताही प्रस्ताव संमत करण्यात आल्यास अध्यक्ष पदावर असलेली व्यक्ती, नंतरचे प्रस्ताव पुढे न ठेवता, ज्या प्रस्तावाला संमती देण्यात आली असेल त्यात प्रस्तावित केलेला सदस्य अध्यक्ष म्हणून निवडून आल्याचे जाहीर करील"** हा मजकूर नव्याने दाखल करण्यात यावा."<br><br>**नियम ६ चे पोट नियम (५), (६) व (७) वगळण्यात यावेत.** | | |
| २ | नियम ७<br>"उपाध्यक्षांची निवडणूक" | नियम ७ मध्ये<br>**"निवडणूक घेणे"** हा मजकूर वगळून **"निवड करणे"** हा मजकूर दाखल करण्यात यावा.<br>**"निवडणूक घेण्यासाठी"** हा मजकूर वगळून **"निवड करण्यासाठी"** हा मजकूर दाखल करण्यात यावा.<br>**"निवडणूकीस"** हा शब्द वगळून **"निवडीस"** हा शब्द दाखल करण्यात यावा. | कित्ता | महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय. |

## अनुसूची-दोन

### समितीने विचारात घेतलेल्या आणि मान्य केलेल्या सूचना/सुधारणा

**सुधारणा क्रमांक १ :**

**नियम ६ "अध्यक्षांची निवडणूक"**

**१.** नियम ६ च्या पोट-नियम (१) मध्ये "**निवडणूक घेण्यासाठी**" हा मजकूर वगळून "**मुख्यमंत्री यांच्या शिफारशीवरून अध्यक्षांची निवड करण्यासाठी**" हा मजकूर दाखल करण्यात यावा."

**२.** नियम ६ च्या पोट-नियम (२) मध्ये "**अशा रीतीने ठरविलेल्या तारखेच्या अगोदर दिवसाच्या मध्यान्हाच्या पूर्वी कोणत्याही वेळी कोणत्याही सदस्यास,**" या मजकुरानंतर "**निवडणुकीसाठी**" या मजकुराऐवजी "**अध्यक्षांची निवड करण्यासाठी**" हा मजकूर दाखल करण्यात यावा."

**३.** नियम ६ च्या पोट-नियम (२) (अ) व (ब) नंतर पुढील परंतुक दाखल करण्यात यावे.

**"परंतु, सदस्याला स्वत:चे नाव सुचविता येणार नाही अथवा त्याचे नाव सुचविण्यात आलेल्या प्रस्तावाला अनुमोदन देता येणार नाही अथवा एकाहून अधिक प्रस्ताव मांडता येणार नाहीत किंवा त्यांना अनुमोदन देता येणार नाही."**

**४.** नियम ६ च्या पोट-नियम (३) ऐवजी**"(३) (अ) कामकाज पत्रिकेत प्रस्ताव ज्याच्या नावावर असेल अशा सदस्याचे नाव पुकारण्यात आल्यानंतर, त्याला प्रस्ताव मांडता येईल अथवा मागे घेता येईल आणि त्यावेळी त्याचे निवेदन तेवढ्यापुरतेच मर्यादित राहील.**

**(ब) जे प्रस्ताव मांडले गेले असतील व ज्यांना रीतसर अनुमोदन देण्यात आले असेल, असे प्रस्ताव ज्या क्रमाने मांडण्यात आले असतील त्याप्रमाणे ते एकामागून एक सभागृहापुढे ठेवण्यात येतील व आवश्यक वाटल्यास मत विभाजनाद्वारे त्यावर निर्णय घेतला जाईल. प्रस्तावाच्या मत विभाजनाच्या वेळी सम-समान मते पडल्यास उपाध्यक्ष, विधानसभेने ठरविलेली व्यक्ती किंवा संविधानाच्या अनुच्छेद १८० च्या खंड (१) अन्वये नेमलेल्या व्यक्तीस, निर्णायक मत (Casting Vote) देण्याचा अधिकार असेल.**

**(क) कोणताही प्रस्ताव संमत करण्यात आल्यास अध्यक्ष पदावर असलेली व्यक्ती, नंतरचे प्रस्ताव पुढे न ठेवता, ज्या प्रस्तावाला संमती देण्यात आली असेल त्यात प्रस्तावित केलेला सदस्य अध्यक्ष म्हणून निवडून आल्याचे जाहीर करील**" हा मजकूर नव्याने दाखल करण्यात यावा."

**५. नियम ६ चे पोट-नियम (५), (६) व (७) वगळण्यात यावेत.**

**सुधारणा क्रमांक २ :**

**नियम ७ "उपाध्यक्षांची निवडणूक"**

१. नियम ७ मध्ये "**निवडणूक घेणे**" हा मजकूर वगळून "**निवड करणे**" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

२. "**निवडणूक घेण्यासाठी**" हा मजकूर वगळून "**निवड करण्यासाठी**" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

३. "**निवडणूकीस**" हा शब्द वगळून "**निवडीस**" हा शब्द दाखल करण्यात यावा.

## अनुसूची-तीन

**समितीला विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांकडून प्राप्त झालेल्या खालील सूचना / सुधारणांवर समितीने विचारविनिमय करून ०४ विरुध्द ०३ अशा बहुमताने निर्णय घेतला.**

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | सूचना / सुधारणा | सूचना/ सुधारणेचे स्वरूप | शिफारस |
|---|---|---|---|---|
| १,२,५,१०,१३, २५,३२,३३, ३८,४२, व ४३. | सर्वश्री. भिमराव तापकिर, सुधीर मुनगंटीवार, मदन येरावार, कृष्णा गजबे, रणधीर सावरकर, श्रीमती श्वेता महाले, ॲड राहुल कुल, सर्वश्री. लक्ष्मण पवार, हरिभाऊ बागडे, व टेकचंद सावरकर वि.स.स | मा. अध्यक्षांच्या निवडी संदर्भातील मा. मुख्यमंत्री सूचित करतील अशी तारीख मा. राज्यपालांना संयुक्तिक न वाटल्यास मा. राज्यपालांच्या सोयीप्रमाणे मा. अध्यक्ष यांची निवडणूक घेण्यात यावी. | सार्वभौम विधीमंडळाचे अधिकार कार्यकारी मंडळास देणे अनाठायी होईल. | अमान्य |
| ३,४,२९,३०, ३१,३५,३६, ३७, ३९, व ४४. | सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, प्रशांत बन्सीलाल बंब, पराग शहा, विजय देशमुख, नामदेव ज. ससाणे, सुनिल कांबळे, रविंद्र चव्हाण, कालिदास कोळंबकर, अमित साटम, व मिहिर कोटेचा वि.स.स. | नियम सहा "अध्यक्षांची निवडणूक" यातील शिफारस क्र. १ मध्ये "मुख्यमंत्री" यांच्या शिफारशीवरुन" हे शब्द वगळण्यात यावेत. | नकारात्मक | अमान्य |
| ६,९,११,१२, १५,१७,१८, १९,२०, २१, २२ व ४१. | श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री किसन कथोरे, चंद्रकांत बच्चू पाटील, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री रविशेठ पाटील, राणा जगजितसिंह पाटील, रवि राणा, श्रीमती मेघना साकोरे, डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, श्री. प्रकाश भारसाकळे वि.स.स. | मा. अध्यक्ष, विधानसभा महाराष्ट्र यांची निवड करताना आवाजी मतदानात स्पष्टता नसल्यास तशी निवड जुन्या नियमातील गुप्त मतदान पध्दतीनेच घेण्यात यावी. | नकारात्मक | अमान्य |
| ७,८,२३,२४, २६,२७,२८, ३४,४०, व ४५. | सर्वश्री. सुरेश भोळे, राहुल नार्वेकर, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री. आकाश पांडुरंग फुंडकर, प्रशांत ठाकूर,सिध्दार्थ शिरोळे, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री. अमित साटम व श्रीमती विद्या ठाकूर वि.स.स. | **(एक) सुधारणा क्र.१ : नियम सहा** " अध्यक्षांची निवडणूक " यातील शिफारस क्र. ४ मध्ये प्रस्तावित पोट-नियम (३) (ब) नंतर पुढील परंतूक दाखल करण्यात यावे- "परंतु, कोणत्याही क्षणी अध्यक्ष पदावर असलेल्या व्यक्तीचे असे मत झाले की, सदर निवड "गुप्त मतदान" पद्धतीने करणे आवश्यक आहे, तर अशी निवड प्रक्रिया तत्क्षणी | नकारात्मक | अमान्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | स्थगित करून त्याऐवजी, पोट-नियम (५), (६) व (७) नुसार गुप्त मतदानाने निवड करण्याबाबत अध्यक्ष पदावरील व्यक्ती सभा-गृहात जाहीर करील. अशा वेळी निवडणुकीचा सुधारित कार्यक्रम सभागृहात जाहीर करून लगतच्या दुसऱ्या कामकाजाच्या दिवशी सभागृहात गुप्त मतदानाने निवड करण्यात येईल."<br>**(दोन) सुधारणा क्र. १ : नियम ६** "अध्यक्षांची निवडणूक " यातील शिफारस क्र. ५ मध्ये "वगळण्यात यावेत" या शब्दांऐवजी "हे पोट-नियम ३ (ब) च्या परंतुकातील तरतुदीकरिता लागू राहतील " हे शब्द दाखल करण्यात यावेत. | | |
| १४. | श्री. जयकुमार गोरे, वि.स.स. | **(एक) सुधारणा क्र. १ : नियम सहा** "अध्यक्षांची निवडणूक" यातील शिफारस क्र. ४ मध्ये प्रस्तावित पोट-नियम (३)(ब) नंतर पुढील परंतुक दाखल करण्यात यावे-<br>"परंतु, कोणत्याही क्षणी अध्यक्ष पदावर असलेल्या व्यक्तीचे असे मत झाले की, सदर निवड "गुप्त मतदान" पद्धतीने करणे आवश्यक आहे, तर अशी निवड प्रक्रिया तत्क्षणी स्थगित करुन त्याऐवजी, पोट-नियम (५), (६) व (७) नुसार गुप्त मतदानाने निवड करण्याबाबत अध्यक्ष पदावरील व्यक्ती सभागृहात जाहीर करील. अशा वेळी निवडणुकीचा सुधारित कार्यक्रम सभागृहात जाहीर करून लगतच्या दुसऱ्या कामकाजाच्या दिवशी | सूचना देणारे सदस्य हे समितीचे सदस्य आहेत. त्यांनी त्यांचे मत समितीच्या बैठकींमध्ये सविस्तरपणे मांडले आहे. तसेच त्यांनी विनंती केल्याप्रमाणे त्यांची भिन्न मतपत्रिका अंतरिम अहवालात जोडली आहे. | अमान्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सभागृहात गुप्त मतदानाने निवड करण्यात येईल."<br>**(दोन) सुधारणा क्र.१ : नियम ६** "अध्यक्षांची निवडणूक" यातील शिफारस क्र. ५ मध्ये "वगळण्यात यावेत" या शब्दांऐवजी "हे पोट-नियम ३ (ब) च्या परंतुकातील तरतुदीकरिता लागू राहतील" हे शब्द दाखल करण्यात यावेत. | | |
| १६. | श्री. धनंजय गाडगीळ, वि.स.स. | मा. अध्यक्ष, विधानसभा महाराष्ट्र यांची निवड करताना आवाजी मतदानात स्पष्टता नसल्यास तशी निवड जुन्या नियमातील गुप्त मतदान पद्धतीनेच घेण्यात यावी." | सूचना देणारे सदस्य हे समितीचे सदस्य आहेत. त्यांनी त्यांचे मत समितीच्या बैठकींमध्ये सविस्तरपणे मांडले आहे. तसेच त्यांनी विनंती केल्याप्रमाणे त्यांची भिन्न मतपत्रिका अंतरिम अहवालात जोडली आहे. | अमान्य |
| ४६ | श्री. देवेंद्र फडणवीस, वि.स.स. तथा विरोधी पक्ष नेता | (१) नियम ६(१) मध्ये "मुख्यमंत्री यांच्या शिफारशीवरुन अध्यक्षांची निवड करण्यासाठी" हा मजकूर दाखल करण्याचे प्रस्तावित आहे. "मुख्यमंत्री यांच्या शिफारशीवरुन" अशी शब्द रचना देशातील कोणत्याही राज्यातील विधानमंडळाच्या संबंधित नियमात नाही. संविधानाच्या अनुच्छेद १६४ प्रमाणे विधानमंडळाने कार्यकारी | नकारात्मक | अमान्य |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रशासनावर अंकुश ठेवणे अपेक्षित आहे. ज्यांनी अंकुश ठेवायचा त्यांच्या म्हणजे विधानसभेच्या अध्यक्षांच्या निवडीचा दिनांक ठरविण्याचा अधिकार, ज्यांच्यावर अंकुश ठेवायचा त्यांनाच म्हणजे कार्यकारी प्रशासनाच्या प्रमुखांना देणे म्हणजे संविधानातील वरील तरतुदीला छेद देणे होय. त्यामुळे सुधारणेतील "मुख्यमंत्री यांच्या शिफारशीवरुन" हे शब्द असंविधानिक असल्यामुळे वगळण्यात यावेत.<br>(२) नियमतील "निवडणूक" या शब्दाऐवजी "निवड करणे" अशा अर्थाच्या सुधारणा प्रस्तावित आहेत. तथापि, नामनिर्देशन पत्र सचिवांकडे सादर करण्याबाबत नियम २(ब) मधील तरतूद तशीच असल्यामुळे सदर प्रक्रिया ही निवडणुकीचीच आहे व निवडीची नाही हे स्पष्ट होते. त्यामुळे नामनिर्देशन प्रक्रियेशी संबंधित नियमातील तरतुदीशी "अध्यक्षांची निवड" हा विसंगत शब्द समाविष्ट होत आहे. त्यामुळे तो पूर्वीप्रमाणेच "निवडणूक" असा ठेवण्यात यावा. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | (३) समितीच्या अहवालात समितीच्या एका सदस्यांनी प्रस्तावित सुधारणा मान्य झाल्यास अध्यक्षांच्या निवडीमध्ये घोडेबाजार होणार नाही असे अभिप्राय दिल्याचे अहवालात म्हटले आहे. याचा अर्थ घोडेबाजार होऊ नये म्हणून सदर बदल प्रस्तावित आहेत असा अन्वयार्थ निघतो. परंतु घोडेबाजार होतो, होऊ शकतो किंवा तो होऊ नये म्हणून नियमातील तरतूद आहे, असे म्हणणे म्हणजे सदनातील सर्व सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान आहे. विधानसभेचे सन्माननीय सदस्य घोडेबाजार करु शकतात अशा अर्थाचे वाक्य नियम समितीच्या अहवालात येणे हेच मुळी आक्षेपार्ह आहे. या गृहितकावर किंबहुना कोणत्याही गृहितकावर अवलंबून नियमामध्ये बदल करणे योग्य होणार नाही. महाराष्ट्रामध्ये अध्यक्षांच्या निवडणुकीमध्ये किंवा सभागृहाच्या अन्य कोणत्याही निवडणुकीमध्ये घोडेबाजार झाल्याचे पूर्वोदहारण नाही किंवा तसा अनुभव नाही. अशा स्थितीत | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | निव्वळ तशा शक्यतेमुळे नियमामध्ये सुधारणा करणे हे पुरोगामी महाराष्ट्राला मान खाली घालायला लावणारे आहे. त्यामुळे प्रस्तुतचे नियम ६ व ७ मधील कोणतेही बदल करण्यात येऊ नयेत.<br>(४) समितीच्या सदस्यांनी भिन्न मतपत्रिकेद्वारे उपस्थित केले मुद्देही रास्त आहे. ते ही मी सुधारणांच्या स्वरुपात खालीलप्रमाणे सुचवू इच्छितो.<br>**(अ)** या नियमांच्या आधारे आत्तापर्यंत १४ वेळा मा.अध्यक्षांची निवड झाली आहे. नियम पुस्तिकेच्या पहिल्या आवृत्तीपासून या तरतुदींचा नियमामध्ये समावेश आहे. अशा स्थितीत राज्याच्या स्थापनेपासून ६० वर्षांनंतर या नियमांमध्ये बदल करण्याची आवश्यकता का भासत आहे, हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे सुधारणांचा हेतूच स्पष्ट होत नसल्यामुळे सुधारणा रद्द करण्यात याव्यात.<br>**(ब)** हा बदल करण्याची सूचना सदस्यांनी दिलेली नसून विधानमंडळ सचिवालयाकडून | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | आली आहे. त्यामध्ये सुधारणेचे कारण "विधानसभेचे अध्यक्ष पद रिक्त असताना ज्या अडचणी येतात त्या लक्षात घेऊन लोकसभेच्या धर्तीवर किंवा विधानपरिषद नियमांच्या धर्तीवर" बदल करण्यात यावा असे नमूद केलेले आहे, असा आक्षेप सदस्यांनी नोंदविलेला आहे.<br>अध्यक्ष पद रिक्त असताना येणाऱ्या अडचणी व अध्यक्ष निवडीची कार्यपद्धती यांचा काहीएक परस्पर संबंध दिसून येत नाही. त्यामुळे नियमात बदल करण्याची मागणी मुळात कोणत्या निश्चित कारणामुळे केली जात आहे, ते स्पष्ट होत नाही. वरील प्रस्तावित कारण संदिग्ध आहे. कोणत्याही सबळ कारणाअभावी नियम बदलणे उचित होणार नाही. घोडेबाजाराच्या कारणामुळे ते असेल तर वर म्हटल्याप्रमाणे हे कारण राज्यासाठी भूषणावह खचितच नाही. त्यामुळे नियमातील सुधारणा रद्द करण्यात याव्यात. | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **(क)** अध्यक्ष पद हे पक्ष निरपेक्ष पद असते. त्यामुळे अध्यक्ष पदावर येणारी व्यक्ती या पदाला न्याय देणारी असावी, यास्तव पक्षीय विचारांच्या पलिकडे जाऊन कोणत्याही दडपणाशिवाय सदस्यांना या पदावरील व्यक्तीची निवड करता यावी या हेतूनेच जाणीवपूर्वक बॅलटची व गुप्त मतदानाची तरतूद नियमामध्ये अंतर्भूत करण्यात आली आहे. ती बदलायची झाल्यास कोणतेही संयुक्तिक कारणही नाही. अशा परिस्थितीत सदर तरतूद बदलण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे नियमातील सुधारणा करण्यात येऊ नयेत.<br>**(ड)** पूर्वीच्या तरतुदीशी अनुरुप म्हणजेच बॅलटची तरतूद उत्तर प्रदेश विधानसभा नियम, उत्तर प्रदेश विधानपरिषद नियम, आंध्र प्रदेश विधानसभा नियम, आंध्र प्रदेश विधान परिषद नियम, तामिळनाडु विधानसभा नियम, तेलंगणा विधानसभा नियम, तेलंगणा विधान परिषद नियम या नियमांमध्ये आहे. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | (लोकसभा नियमातही पूर्वी ही तरतूद होती.) अशा परिस्थितीत महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात तरी ती बदलणे योग्य होणार नाही त्यामुळे नियमातील प्रस्तावित सुधारणा रद्द करण्यात याव्यात.<br>**(इ)** याउपरही हा निर्णय घ्यायचाच असेल तर आमचा त्यासाठी विरोध असल्याने आम्ही उपस्थित केलेल्या मुद्यांचीही अहवालात नोंद घ्यावी. आमचा विरोध अहवालामध्ये नोंदवावा. तसेच मतविभाजनाने निर्णय घ्यावा व तशी नोंद अहवालामध्ये घेण्यात यावी, असाही आक्षेप सदस्यांनी नोंदविलेला दिसतो. | | |
| ४७ | श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. | 1. The present objections are required to be raised in view of the amendments proposed to Rule 6 and Rule 7 of the Maharashtra legislative Assembly Rules, 1960 (MLS Rules) in as much as the same are sought to be made in object and utter violation | नकारात्मक | अमान्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | of the procedure mandated by the MLS Rules. Further, the Rules Committee constituted for the proposed amendments has been constituted dehors the provisions of the MLS Rules and therefore this goes to the root of the matter since the constitution of the Committee is itself illegal.<br>2. The MLS Rules have been framed for regulating the business of the House under Article 208 of the Constitution of India and therefore have Constitutional Sanctity.<br>3. Rule 6 of the MLS Rules provides for election of the Speaker whereas Rule 7 provides for election of the Deputy Speaker. As we are aware, presently the Chair of the Speaker is vacant.<br>4. By the proposed amendments to Rules 6 and 7, the procedure for | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | election of Speaker and Deputy Speaker is sought to be amended. I however submit that the amendments have been brought in complete violation of the procedure prescribed by the MLS Rules.<br>5. Rule 223 provides that there shall be a "Committee on Rules" to recommend any amendments or additions to these Rules.<br>6. Rule 224 provides for constitution of the Committee on Rules and reads thus:<br>"224. At the commencement of the Assembly or from time to time, as the case may be, a Committee on Rules shall be nominated by the Speaker and the Committee shall consist of eleven members including the Chairman of the Committee. The Speaker shall be the *ex-officio* Chairman of the Committee." | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 7. A reading of Rule 224 thus makes it clear that the Committee on Rules must consist of 11 members including the Chairman. It is further clear that the Speaker of the House is designated to be the *Ex Officio* Chairman Committee. I therefore submit that in the absence of the Speaker the Committee on Rules could not be validly onstituted.<br><br>8. I further submit that in the absence of the Speaker of the House, the Deputy Speaker could not have been the Acting Chairman. It is submitted that the Deputy Speaker is not entitled to assume all the powers of the Speaker in his absence. I submit that Rule 10 of the MLS Rules categorically provides for Delegation of Powers by the Speaker to the | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | Deputy Speaker and reads thus:<br><br>"10. When by reason of illness or absence from India or for any other sufficient cause the Speaker is unable to excise any of his powers or discharge any of his functions, he may by order in writing delegate to the Deputy Speaker such of his powers and functions as he may deem fit. He may likewise revoke any such delegation."<br><br>9. A perfunctory reading of Rule 10 would make it clear that the Speaker must expressly delegate his powers to the Deputy Speaker by an order in writing, As a corollary, ehat follows is that in the absence of such an express delegation, the Deputy Speaker cannot assume the powers of the Speaker. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 10. I submit that therefore, for lack of such an express delegation of power, the Deputy Speaker could not have acted as Chairman of the Committee on Rules. Under the circumstances, I say and subunit that the very constitution of the Committee on Rules was illegal which goes to the very root of the matter. I further submit that any business transacted by the Committee on Rules qua the proposed amendments to the Rules is completely vitiated on account of illegal constitution of the Committee on Rules. | | |

# अनुसूची-चार

## महाराष्ट्र विधानसभेच्या नियम समितीचा पहिला अंतिम अहवाल २०२१

## श्री. जयकुमार गोरे वि.स.स.

(१) नियम पुस्तिकेच्या पहिल्या आवृत्ती पासून या तरतुदींचा नियमामध्ये समावेश आहे. या नियमांच्या आधारे आत्तापर्यंत १४ वेळा मा. अध्यक्षांची निवड झाली आहे. अशा स्थितीत आत्ताच या नियमांमध्ये बदल करण्याची आवश्यकता का भासत आहे?

(२) हा बदल करण्याची सूचना सदस्यांनी दिलेली नसून विधान मंडळ सचिवालयाकडून आली आहे. त्यामध्ये सुधारणेचे कारण नियम समितीने दि. ६ जुलै, २०२१ रोजीच्या बैठकीत निर्णय घेतल्यानुसार सुधारणा करण्यात येत असल्याचे नमूद केले आहे. दि. ६ जुलै, २०२१ चे समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त तपासले असता त्यामध्ये "विधानसभेचे अध्यक्षपद रिक्त असताना ज्या अडचणी येतात त्या लक्षात घेऊन लोकसभेच्या धर्तीवर किंवा विधानपरिषद नियमांच्या धर्तीवर" बदल करण्यात यावा असे विधानमंडळ सचिवांनी म्हटले असल्याचे दिसून येते.

अध्यक्ष पद रिक्त असताना येणाऱ्या अडचणी व अध्यक्ष निवडची कार्यपद्धती यांचा काही एक परस्पर संबंध दिसून येत नाही. त्यामुळे नियमात बदल करण्याची मागणीच मुळात कोणत्या निश्चित कारणामुळे केली जात आहे, ते स्पष्ट होत नाही. वरील प्रस्तावित कारण संदिग्ध आहे. कोणत्याही सबळ कारणाअभावी नियम बदलणे उचित होणार नाही.

(३) अध्यक्षपद हे पक्ष निरपेक्ष पद असते. त्यामुळे अध्यक्षपदावर येणारी व्यक्ती या पदाला न्याय देणारी असावी, यास्तव पक्षीय विचारांच्या पलिकडे जाऊन कोणत्याही दडपणाशिवाय सदस्यांना या पदावरील व्यक्तीची निवड करता यावी या हेतूनेच जाणिवपूर्वक बॅलटची व गुप्त मतदानाची तरतूद नियमामध्ये अंतर्भूत करण्यात आली आहे. ती बदलायची झाल्यास कोणतेही संयुक्तिक कारणही नाही. अशा परिस्थितीत सदर तरतूद बदलण्याची आवश्यकता नाही.

(४) याबाबत अन्य राज्यांकडून त्यांच्या नियमांसंबंधी काही माहिती मागविली आहे का? आमच्या माहिती प्रमाणे अशाच प्रकारची बॅलटची तरतूद उत्तरप्रदेश विधानसभा नियम, उत्तर प्रदेश विधानपरिषद नियम, आंध्रप्रदेश विधानसभा नियम, आंध्र प्रदेश विधान परिषद नियम, तामिळनाडु विधानसभा नियम, तेलगंणा विधानसभा नियम, तेलंगणा विधानपरिषद नियम या नियमांमध्ये आहे. (लोक सभा नियमातही पूर्वीही तरतूद होती.) अशा परिस्थितीत महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात तरी ती बदलणे योग्य होणार नाही.

(५) या उपरही हा निर्णय घ्यायचाच असेल तर आमचा त्यासाठी विरोध असल्याने आम्ही उपस्थित केलेल्या मुद्यांचीही अहवालात नोंद घ्यावी. आमचा विरोध अहवालामध्ये नोंदवावा. तसेच मतविभाजनाने निर्णय घ्यावा व तशी नोंद अहवालामध्ये घेण्यात यावी.

# अनुसूची-पाच

## महाराष्ट्र विधानसभेच्या नियम समितीचा पहिला अंतिम अहवाल २०२१

## डॉ. संदीप धुर्वे वि.स.स.

(१) नियम पुस्तिकेच्या पहिल्या आवृत्ती पासून या तरतूदींचा नियमामध्ये समावेश आहे. या नियमांच्या आधारे आत्तापर्यंत १४ वेळा मा. अध्यक्षांची निवड झाली आहे. अशा स्थितीत आत्ताच या नियमांमध्ये बदल करण्याची आवश्यकता का भासत आहे?

(२) हा बदल करण्याची सूचना सदस्यांनी दिलेली नसून विधानमंडळ सचिवालयाकडून आली आहे. त्या मध्ये सुधारणेचे कारण नियम समितीने दि. ६ जुलै, २०२१ रोजीच्या बैठकीत निर्णय घेतल्या नुसार सुधारणा करण्यात येत असल्याचे नमूद केले आहे. दि. ६ जुलै, २०२१ चे समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त तपासले असता त्यामध्ये "विधानसभेचे अध्यक्ष पद रिक्त असताना ज्या अडचणी येतात त्या लक्षात घेऊन लोक सभेच्या धर्तीवर किंवा विधानपरिषद नियमांच्या धर्तीवर "बदल करण्यात यावा असे विधानमंडळ सचिवांनी म्हटले असल्याचे दिसून येते.

अध्यक्ष पद रिक्त असताना येणाऱ्या अडचणी व अध्यक्ष निवडची कार्यपद्धती यांचा काही एक परस्पर संबंध दिसून येत नाही. त्यामुळे नियमात बदल करण्याची मागणीच मुळात कोणत्या निश्चित कारणामुळे केली जात आहे, ते स्पष्ट होत नाही. वरील प्रस्तावित कारण संदिग्ध आहे. कोणत्याही सबळ कारणा अभावी नियम बदलणे उचित होणार नाही.

(३) अध्यक्ष पद हे पक्ष निरपेक्ष पद असते. त्यामुळे अध्यक्ष पदावर येणारी व्यक्ती या पदाला न्याय देणारी असावी, यास्तव पक्षीय विचारांच्या पलिकडे जाऊन कोणत्याही दडपणाशिवाय सदस्यांना यापदावरील व्यक्तीची निवड करता यावी या हेतूनेच जाणिवपूर्वक बॅलटची व गुप्त मतदानाची तरतूद नियमामध्ये अंतर्भूत करण्यात आली आहे. ती बदलायची झाल्यास कोणतेही संयुक्तिक कारणही नाही. अशा परिस्थितीत सदर तरतूद बदलण्याची आवश्यकता नाही.

(४) याबाबत अन्य राज्यांकडून त्यांच्या नियमांसंबंधी काही माहिती मागविली आहे का? आमच्या माहितीप्रमाणे अशाच प्रकारची बॅलटची तरतूद उत्तर प्रदेश विधानसभा नियम, उत्तरप्रदेश विधानपरिषद नियम, आंध्रप्रदेश विधानसभा नियम, आंध्रप्रदेश विधानपरिषद नियम, तामिळनाडु विधानसभा नियम, तेलगंणा विधानसभा नियम, तेलंगणा विधानपरिषद नियम या नियमांमध्ये आहे. (लोकसभा नियमातही पूर्वी ही तरतूद होती.) अशा परिस्थितीत महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात तरी ती बदलणे योग्य होणार नाही.

(५) या उपर ही हा निर्णय घ्यायचाच असेल तर आमचा त्यासाठी विरोध असल्याने आम्ही उपस्थित केलेल्या मुद्यांची ही अहवालात नोंद घ्यावी. आमचा विरोध अहवालामध्ये नोंदवावा. तसेच मतविभाजनाने निर्णय घ्यावा व तशी नोंद अहवालामध्ये घेण्यात यावी.

# अनुसूची-सहा

## महाराष्ट्र विधान सभेच्या नियम समितीचा पहिला अंतिम अहवाल २०२१
## श्री. धनजंय गाडगीळ वि.स.स.

(१) नियम पुस्तिकेच्या पहिल्या आवृत्तीपासून या तरतूदींचा नियमामध्ये समावेश आहे. या नियमांच्या आधारे आत्तापर्यंत १४ वेळा मा. अध्यक्षांची निवड झाली आहे. अशा स्थितीत आत्ताच या नियमांमध्ये बदल करण्याची आवश्यकता का भासत आहे?

(२) हा बदल करण्याची सूचना सदस्यांनी दिलेली नसून विधानमंडळ सचिवालयाकडून आली आहे. त्या मध्ये सुधारणेचे कारण नियम समितीने दि. ६ जुलै, २०२१ रोजीच्या बैठकीत निर्णय घेतल्यानुसार सुधारणा करण्यात येत असल्याचे नमूद केले आहे. दि. ६ जुलै, २०२१ चे समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त तपासले असता त्यामध्ये "विधानसभेचे अध्यक्ष पद रिक्त असताना ज्या अडचणी येतात त्या लक्षात घेऊन लोक सभेच्या धर्तीवर किंवा विधानपरिषद नियमांच्या धर्तीवर "बदल करण्यात यावा असे विधानमंडळ सचिवांनी म्हटले असल्याचे दिसून येते.

अध्यक्ष पद रिक्त असताना येणाऱ्या अडचणी व अध्यक्ष निवडची कार्यपद्धती यांचा काही एक परस्पर संबंध दिसून येत नाही. त्यामुळे नियमात बदल करण्याची मागणीच मुळात कोणत्या निश्चित कारणामुळे केली जात आहे, ते स्पष्ट होत नाही. वरील प्रस्तावित कारण संदिग्ध आहे. कोणत्याही सबळ कारणाअभावी नियम बदलणे उचित होणार नाही.

(३) अध्यक्ष पद हे पक्ष निरपेक्ष पद असते. त्यामुळे अध्यक्ष पदावर येणारी व्यक्ती या पदाला न्याय देणारी असावी, यास्तव पक्षीय विचारांच्या पलिकडे जाऊन कोणत्याही दडपणाशिवाय सदस्यांना या पदावरील व्यक्तीची निवड करता यावी या हेतूनेच जाणिवपूर्वक बॅलटची व गुप्त मतदानाची तरतूद नियमामध्ये अंतर्भूत करण्यात आली आहे. ती बदलायची झाल्यास कोणतेही संयुक्तिक कारणही नाही. अशा परिस्थितीत सदर तरतूद बदलण्याची आवश्यकता नाही.

(४) याबाबत अन्य राज्यांकडून त्यांच्या नियमांसंबंधी काही माहिती मागविली आहे का? आमच्या माहितीप्रमाणे अशाच प्रकारची बॅलटची तरतूद उत्तरप्रदेश विधानसभा नियम, उत्तरप्रदेश विधानपरिषद नियम, आंध्रप्रदेश विधानसभा नियम, आंध्रप्रदेश विधान परिषद नियम, तामिळनाडु विधानसभा नियम, तेलगंणा विधानसभा नियम, तेलंगणा विधानपरिषद नियम या नियमांमध्ये आहे. (लोकसभा नियमातही पूर्वी ही तरतूद होती.) अशा परिस्थितीत महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात तरी ती बदलणे योग्य होणार नाही.

(५) या उपरही हा निर्णय घ्यायचाच असेल तर आमचा त्यासाठी विरोध असल्याने आम्ही उपस्थित केलेल्या मुद्यांचीही अहवालात नोंद घ्यावी. आमचा विरोध अहवालामध्ये नोंदवावा. तसेच मतविभाजनाने निर्णय घ्यावा व तशी नोंद अहवालामध्ये घेण्यात यावी.

# परिशिष्ट - एक

(समितीच्या बैठका)

## पहिली बैठक

विधानसभा नियम समितीची बैठक मंगळवार, दि. ६ जुलै, २०२१ रोजी सकाळी ११-३० वाजता कक्ष क्रमांक ०४३, तळ मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्मानीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

### उपस्थिती

१) श्री. नरहरी झिरवाळ, मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा तथा कार्यकारी समितीप्रमुख.
२) श्री. दिपक केसरकर, वि.स.स.
३) ॲड. अशोक पवार, वि.स.स.
४) श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स.
५) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
१) श्री.राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव
२) श्री. राजेश तारवी, उप सचिव
३) श्री. जयवंत राणे, अवर सचिव (समिती)

**संसदीय कार्य विभाग**
श्री. सतीश वाघोले, सचिव

सदर बैठकीत समितीकडे विचारार्थ असलेल्या सूचना/सुधारणांवर समितीने विचारविनिमय केला.

**दुसरी बैठक**

विधानसभा नियम समितीची बैठक बुधवार, दि. २२ सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी १०-०० वाजता कक्ष क्रमांक ०४३, तळ मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील प्रमाणे सन्मानीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती**

१) श्री. नरहरी झिरवाळ, मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा तथा कार्यकारी समितीप्रमुख.
२) ॲड. अशोक पवार, वि.स.स.
३) श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स.
४) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.
५) श्री. धनंजय गाडगीळ, वि.स.स.
६) डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव
२) श्री. विलास आठवले, उप सचिव
३) श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव

**संसदीय कार्य विभाग व विधी व न्याय (विधी विधान) विभाग**

श्री. सतीश वाघोले, सचिव

सदर बैठकीत समितीकडे विचारार्थ असलेल्या सूचना/सुधारणांवर समितीने विचारविनिमय केला.

## तिसरी बैठक

विधानसभा नियम समितीची बैठक बुधवार, दि. ०८ डिसेंबर, २०२१ रोजी दुपारी ०१:०० वाजता कक्ष क्रमांक ०४३, तळ मजला, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्मानीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

## उपस्थिती

१) श्री. नरहरी झिरवाळ, मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा तथा कार्यकारी समितीप्रमुख.
२) श्री. दिपक केसरकर, वि.स.स.
३) ॲड. अशोक पवार, वि.स.स.
४) श्री. धनंजय गाडगीळ, वि.स.स.
५) श्री. जयकुमार गोरे, वि.स.स.
६) डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव
२) श्री. विलास आठवले, उप सचिव
३) श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव
४) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

सदर बैठकीत समितीकडे विचारार्थ असलेल्या सूचना / सुधारणांवर समितीने विचारविनिमय केला.

## चौथी बैठक

विधानसभा नियम समितीची बैठक बुधवार, दि. १५ डिसेंबर, २०२१ रोजी दुपारी ०३-३० वाजता कक्ष क्रमांक ०४३, तळ मजला, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली होती. सदर बैठकीस खालील प्रमाणे सन्मानीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

### उपस्थिती

१) श्री. नरहरी झिरवाळ, मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा तथा कार्यकारी समितीप्रमुख.

२) श्री. दिपक केसरकर, वि.स.स.

३) श्री. मकरंद जाधव-पाटील, वि.स.स.

४) ॲड. अशोक पवार, वि.स.स.

५) श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स.

६) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

७) श्री. धनंजय गाडगीळ, वि.स.स.

८) श्री. जयकुमार गोरे, वि.स.स.

९) डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

२) श्री. विलास आठवले, उप सचिव

३) श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव

४) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

समितीने प्रारूप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**पाचवी बैठक**

विधानसभा नियम समितीची बैठक गुरुवार, दि. २३ डिसेंबर, २०२१ रोजी दुपारी ०२-०० वाजता कक्ष क्रमांक ०४३, तळ मजला, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती**

१) श्री. नरहरी झिरवाळ, मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा तथा कार्यकारी समिती प्रमुख

२) श्री. मकरंद जाधव-पाटील, वि.स.स.

३) ॲड. अशोक पवार, वि.स.स.

४) श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स.

५) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

६) श्री. धनंजय गाडगीळ, वि.स.स.

७) श्री. जयकुमार गोरे, वि.स.स.

८) डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

२) श्री. विलास आठवले, उप सचिव

३) श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव

४) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

**संसदीय कार्य विभाग व विधी व**

**न्याय (विधी विधान) विभाग**

श्री. सतीश वाघोले, सचिव

समितीने विधानसभेच्या मा. सदस्यांकडून प्राप्त झालेल्या सूचना/सुधारणांवर विचारविनिमय करून त्यावर निर्णय घेऊन अंतिम अहवाल मान्य केला.

------------

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई